


| वर्ष - 9 | अंक -36 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™




**आज सहावी माळ**
**स्कंदमाता देवी**

## आतील पानांत


- सुपर ओव्हरमध्ये पहिल्या चेंडूवर विजय!
- यजमान भारताचे सर्वोत्तम कामगिरीचे लक्ष्य
- दोन आठवड्यांत मदतीचा प्रस्ताव?
- FIR दाखल होताच काढले ५० लाख



www.mahaenews.com | शनिवार, दि. 27 सप्टेंबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!


## मुंबईत महायुती, ठाण्यात वेगळा खेळ!

### महापालिका निवडणुकीत फडणवीसांचे संकेत; नोव्हेंबर- जानेवारीत मतदान प्रक्रिया, सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ३१ जानेवारी २०२६ पर्यंत सर्व निवडणुका पूर्ण कराव्याच

# मुंबईत एकत्र, ठाण्यात स्वतंत्र!

### ठाण्यात शिवसेना स्वतंत्र, पुणे-पिंपरी महापालिकेत भाजप-शिवसेना सोबत, राष्ट्रवादी स्वतंत्र

| नवी दिल्ली | प्रतिनिधी | महाईन्यूज

**राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जवळ येत असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नवी दिल्लीहून महत्त्वाचे संकेत दिले आहेत. मुंबई महापालिकेत भारतीय जनता पक्ष, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस या तिन्ही पक्षांची महायुती एकत्र लढणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मात्र ठाण्यात चित्र वेगळे दिसू शकते. इथे शिवसेना स्वतंत्र रिंगणात उतरणार असून भाजप-राष्ट्रवादी काँग्रेसची जोडी दिसू शकते.**

सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती सूर्यकांत व न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची यांच्या खंडपीठाने नुकतेच राज्य सरकारला स्पष्ट आदेश दिले आहेत की ३१ जानेवारी २०२६ पूर्वी २९ महानगरपालिका, २५७ नगरपालिका, २६ जिल्हा परिषदा आणि २८९ पंचायत समित्यांच्या निवडणुका पूर्ण कराव्यात.



महापालिका निवडणुका हे राज्यातील राजकीय तापमान वाढवणारे मोठे रणांगण ठरणार आहे. मुंबईत महायुती एकत्र राहणे हे पक्षांसाठी फायदेशीर ठरेल, परंतु ठाणे व पुणे-पिंपरीत होणाऱ्या स्वतंत्र लढतीतून मतदारांचा मूड स्पष्ट होईल. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या अंतिम मुदतीमुळे यावेळी निवडणुका टाळता येणार नाहीत. त्यामुळे नोव्हेंबरपासून राज्यभर राजकीय घमासान रंगणार हे नक्की.

**सीमांकन प्रक्रिया ३१ ऑक्टोबरपर्यंत पूर्ण करणे अनिवार्य**

ईव्हीएम संदर्भात ३० नोव्हेंबरपर्यंत प्रतिज्ञापत्र दाखल करणे बंधनकारक

प्रभाग रचनेवरील सुनावण्या वेगाने सुरू

नगरविकास विभागाला अंतिम प्रस्ताव ६ ऑक्टोबरपर्यंत सादर होणार

यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची उलटी गणती सुरू झाली आहे.

## पुणे-पिंपरी – स्वतंत्र समीकरण

पुणे व पिंपरी-चिंचवड या औद्योगिक शहरांमध्ये भाजप व शिवसेना एकत्र लढणार आहेत, तर राष्ट्रवादी काँग्रेस स्वतंत्रपणे मैदानात उतरणार आहे. पुणे महानगरपालिका नेहमीच राष्ट्रवादी काँग्रेसचा बालेकिल्ला राहिली आहे. भाजप-शिवसेनेची एकत्र आघाडी राष्ट्रवादीसाठी धोक्याची घंटा आहे. पिंपरी-चिंचवडमध्येही भाजपने मागील निवडणुकांमध्ये मोठे यश मिळवले होते. अध्यक्षपदाची चर्चा फेटाळली फडणवीस यांचे नाव भाजपच्या राष्ट्रीय अध्यक्षपदासाठी चर्चेत होते. मात्र त्यांनी स्पष्ट केले की, “मी या शर्यतीत नाही. २०२९ पर्यंत राज्यातच काम करावे, अशी पक्षाची इच्छा आहे.” यामुळे राज्याच्या राजकारणात त्यांचा फोकस कायम राहणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

**“निवडणुका नोव्हेंबर-जानेवारीत” – फडणवीस**

फडणवीस म्हणाले, “दिवाळीनंतर म्हणजे नोव्हेंबर ते जानेवारी या कालावधीत निवडणुका होण्याची शक्यता आहे. बहुतेक ठिकाणी महायुती होईल, मात्र शक्य नसेल तिथे मैत्रीपूर्ण लढती होतील.” त्यांनी स्पष्ट केले की मुंबईत महायुती एकत्र राहील, परंतु पुणे-पिंपरी-चिंचवडमध्ये भाजप-शिवसेना हातात हात घालतील तर राष्ट्रवादी काँग्रेस स्वतंत्रपणे लढेल.

**युती की मैत्रीपूर्ण लढत?**

राज्यात २०२२ पासून निवडणुका प्रलंबित असल्यामुळे विविध पक्षांमध्ये समन्वय बैठका सुरू आहेत. महायुती जिथे शक्य आहे, तिथे एकत्र उमेदवारी देण्याचे धोरण दिसते. मात्र काही ठिकाणी “मैत्रीपूर्ण लढती” या नावाखाली प्रत्यक्षात राजकीय चुरस होणार आहे.

**फडणवीस यांच्याच शब्दांत,**

“नको तिथे युती केली, तर मतदार नाराज होतात. तेव्हा काही ठिकाणी वेगळी लढत अनिवार्य आहे.”

**मुंबई महापालिका – सर्वात मोठी परीक्षा**

मुंबई महानगरपालिका ही आशियातील सर्वात श्रीमंत महापालिका आहे. येथे महायुती एकत्र राहणे हा भाजपा, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस या तिन्ही पक्षांसाठी प्रतिष्ठेचा मुद्दा आहे

निधी, सत्ता व राजकीय भविष्य यावर मुंबई महापालिकेचा ठसा असतो.

शिवसेनेचा गड मोडण्यासाठी भाजपला महायुतीची गरज आहे.

**राष्ट्रवादी काँग्रेसलाही मुंबईत स्वतंत्र पाय रोवणे अवघड आहे.**

यामुळे मुंबईत तिन्ही पक्ष एकत्र आल्यास विरोधकांसाठी मोठे आव्हान उभे राहणार आहे.

**ठाण्यात वेगळा खेळ**

मुंबईत महायुती असली तरी ठाण्यात शिवसेना स्वतंत्र लढणार असल्याचे संकेत दिले गेले आहेत. यामुळे ठाण्यात भाजप-राष्ट्रवादी काँग्रेस विरुद्ध शिवसेना अशी सरळ लढत पाहायला मिळेल. ठाणे हा शिंदे गटासाठी महत्वाचा गड मानला जातो. त्यामुळे इथे होणारी लढत राज्याच्या राजकीय समीकरणावर मोठा परिणाम करेल.

## हजारो शेतकऱ्याचे नुकसान

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंची ग्वाही

# कर्ज माफीचा निर्णय सरकार नक्की घेणार

## सरकारकडून किती मदत मिळणे अपेक्षित

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्यातील अनेक भागात झालेल्या अतिवृष्टीमुळे हजारो शेतकऱ्याचे नुकसान झाले आहे. त्या सर्व शेतकऱ्याचे कर्ज माफ करण्यात यावे, केंद्र आणि राज्य सरकार मार्फत मदत करण्यात यावी, अशी मागणी विरोधकांकडून केली जात आहे. त्या सर्व घडामोडी दरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भेट घेतली.**



त्या भेटीमध्ये नेमकी काय चर्चा झाली असेल याबाबत सर्वांना उत्सुकता आहे. त्याच दरम्यान राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे पुणे दौऱ्यावर होते.त्यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भेट झाली आहे. त्यामुळे केंद्र सरकारकडून किती मदत मिळणे अपेक्षित आहे. त्या प्रश्नावर ते म्हणाले, आजवर प्रत्येक वेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी हे शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहून मदत करत आले आहे. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे यंदा देखील शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहतील,असा विश्वास व्यक्त करीत ते पुढे म्हणाले, शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी राज्य सरकारमार्फत कोणत्याही प्रकारचा हात आखडता घेणार नाही.सर्वतोपरी मदत करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी देण्यात यावी, अशी मागणी विरोधकांकडून केली जात आहे. त्या प्रश्नावर ते म्हणाले,हे संकट मोठ असून शेतकऱ्यांना जेवढी मदत करता येईल, तेवढी कमीच आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार,मी आणि अनेक मंत्री शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांचे दुःख आणि नुकसान पाहिले आहे. त्यामुळे पुन्हा शेतकऱ्याला नव्याने उभा करणे आणि त्याच्या डोळ्यातील अश्रू पुसणे ही प्राथमिकता आहे. शेतकऱ्यांच्या कर्ज माफीचा निर्णय सरकार नक्की घेणार अशी भूमिका यावेळी त्यांनी मांडली.राज्यातील काही जिल्ह्यांत प्रामुख्याने मराठवाडा तसेच, सोलापूर जिल्ह्यातील अतिवृष्टीमुळे झालेल्या शेतकऱ्यांच्या नुकसानीची माहिती देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. राज्याचा प्रस्ताव आल्यानंतर भरीव आर्थिक मदत देण्याचे आश्वासन मोदींनी दिल्याचे फडणवीस यांनी पत्रकारांना सांगितले. पुढील दोन आठवड्यांमध्ये हा प्रस्ताव केंद्राला सादर केला जाण्याची शक्यता आहे. राज्याला राष्ट्रीय आपत्ती निवारण निधीतून मदत मिळावी, अशी मागणी राज्य सरकारने केंद्र सरकारकडे पत्राद्वारे केली आहे. त्या संदर्भातील पत्र केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना गुरुवारी मुंबईमध्ये देण्यात आले. या पत्रावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. शहा यांच्याशी चर्चा केल्यानंतर दुसऱ्याच दिवशी, शुक्रवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्लीत येऊन पंतप्रधान मोदींची भेट घेतली. राज्य आपत्ती निवारण निधीतून शेतकऱ्यांना राज्य सरकारने २ हजारांहून अधिक कोटींची तातडीची मदत दिली असली तरी, अतिवृष्टीने झालेले नुकसान पाहता केंद्राच्या भरीव निधीची गरज असल्याचे फडणवीस यांनी सांगितले. अजून आढावा घेण्याचे काम पूर्ण झालेले नसल्याने नुकसानीचा नेमका आकडा सांगता येणार नाही. शिवाय, येत्या दोन दिवसांमध्ये (२७-२८ सप्टेंबर) पुन्हा अतिवृष्टी होण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. केंद्राला एकदाच प्रस्ताव द्यावा लागतो, त्यानंतर त्यामध्ये बदल करता येत नाही. शेतीच्या नुकसानीचा पूर्ण आढावा घेऊन राज्याकडून केंद्राला प्रस्ताव सादर केला जाईल, अशी माहिती फडणवीस यांनी दिली.न राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे पुणे दौऱ्यावर होते.त्यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भेट झाली आहे. त्यामुळे केंद्र सरकारकडून किती मदत मिळणे अपेक्षित आहे.

### सरसकट कर्जमाफी देण्यात यावी

त्या प्रश्नावर ते म्हणाले, आजवर प्रत्येक वेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी हे शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहून मदत करत आले आहे. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे यंदा देखील शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहतील,असा विश्वास व्यक्त करीत ते पुढे म्हणाले, शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी राज्य सरकारमार्फत कोणत्याही प्रकारचा हात आखडता घेणार नाही.सर्वतोपरी मदत करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी देण्यात यावी.

# विमानतळासाठी जमीनमोजणीला सुरुवात

## पहिल्या दिवशी तीन गावांतील 50 हेक्टर क्षेत्रफळाची मोजणी

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**पुरंदर येथील प्रस्तावित आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी संमतिपत्रे दिलेल्या शेतकऱ्यांच्या जमिनीची मोजणीप्रक्रिया शुक्रवारपासून सुरू झाली. पहिल्या दिवशी पोलीस बंदोबस्तामध्ये मुंजवडी, खानवडी आणि एखतपूर या गावांतील ५० हेक्टर जमिनीची मोजणीप्रक्रिया पूर्ण करण्यात आली. तीन आठवडे ही प्रक्रिया सुरू राहणार असून, आवश्यकता भासल्यास मोजणीसाठी ड्रोनचा वापर केला जाणार आहे.**



सात गावांतील मोजणीसाठी पाच पथके स्थापन करण्यात आली आहेत.पुरंदर तालुक्यातील तीन गावांमध्ये भूसंपादन समन्वयक डॉ. कल्याण पांढरे, पुरंदरच्या उपविभागीय अधिकारी वर्षा लांडगे, तसेच भूसंपादन अधिकारी संगीता राजापूर-चौगुले या अधिकाऱ्यांनी संबंधित गावांमध्ये मोजणीची प्रक्रिया शुक्रवारी सकाळपासून सुरू केली.

तीन गावांतील शेतकऱ्यांनी पथकांना मोजणीची प्रक्रिया पूर्ण करण्यास सहकार्य केले.

### २ हजार ८१० जागेचे संपादन

शेतकऱ्यांकडून संमतिपत्रे स्वीकारण्यास जिल्हा प्रशासनाने २५ ऑगस्टपासून प्रारंभ केला होता. ही मुदत गुरुवारी (२५ सप्टेंबर) संपुष्टात आल्याने शुक्रवारपासून प्रत्यक्ष मोजणीप्रक्रियेला सुरुवात करण्यात आली. संमतिपत्रे देण्याच्या कालावधीत ३ हजार २२० शेतकऱ्यांनी २ हजार ८१० एकर जागेचे संपादन करण्यासंदर्भातील संमतिपत्रे सादर केली आहेत.

त्यामुळे दिवसभरात ५० हेक्टर जागेची मोजणी झाल्याची माहिती जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आली.मोजणीप्रक्रिया २० ऑक्टोबरपर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. मोजणीप्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर दरनिवाडा निश्चित करून शेतकऱ्यांना देण्यात येणारा मोबदला आणि परताव्याबाबत सरकारकडे प्रस्ताव पाठविण्यात येणार आहे. त्यानंतर थेट भूसंपादनाची प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे.दरम्यान, विमानतळासाठी पारगाव, कुंभारवळण, एखतपूर, मुंजवडी, खानवडी, उदाचीवाडी आणि वनपुरी अशा सात गावांमधून जमीन संपादित होणार आहे.

न

## पिंजरा लावून बिबट्याला पकडण्याची मागणी

# चऱ्होली परिसरात बिबट्याचा वावर!

## बिबट्या दिसल्याने स्थानिकांमध्ये दहशत आणि भीतीचे वातावरण

पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**चऱ्होली बुद्रुक परिसरातील राही कस्तुरी अपार्टमेंटच्या मागील बाजूच्या शेतात बिबट्याचे दोन बछड्यांचा मुक्त वावर दिसून आला. बिबट्या दिसल्याने स्थानिकांमध्ये दहशत आणि भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. महिला, लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिक रात्रीच्या वेळेस घराबाहेर पडायला घाबरत आहेत. वन विभागाने पिंजरा लावून बिबट्याला पकडण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.**




चऱ्होली बुद्रुक भागात गेल्या काही दिवसांपासून बिबट्याचा वावर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. बिबट्याचा वावर मानवी वस्तीजवळ दिसून येत आहे. ७ ऑगस्ट दरम्यान सुनील काटे यांच्या शेतातील बाभळींच्या झाडावर बिबट्या दिसला होता. त्यानंतर वन विभागाने सापळा रचून बिबट्याला पकडण्यासाठी प्रयत्न केला. मात्र, बिबट्याने वन विभागाला चकवा देऊन तेथून पळ काढला. त्यानंतर पुन्हा काही दिवसांतच इंद्रायणी नदी किनारी बिबट्याचे दर्शन झाले. एक सप्टेंबर रोजी एका सोसायटीच्या सीमा भिंतीवर बसल्याचे दिसून आला.

त्यामुळे सोसायटीतील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि रात्री कामावर जाणारे नोकरदार यांना मोठा धोका निर्माण झाला आहे. शेतकरी शेतात जाण्यास आणि महिला घराबाहेर पडण्यासही घाबरत आहेत.

सुरक्षेच्याद्दष्टीने लोक घरातच राहणे पसंत करत असल्याने दैनंदिन जीवनावर परिणाम झाला आहे. त्याने पाळीव जनावरांवर हल्ला केल्याचेही स्थानिकांनी सांगितले आहे. वन विभागाने तत्काळ दखल घेऊन बिबट्याला पकडण्यासाठी किंवा त्याला पुन्हा जंगलात हुसकावून लावण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना त्वरित कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

> चऱ्होली परिसरात वन विभागाचे कर्मचारी गस्त घालत आहेत. नागरिकांनी जुना व्हिडीओ किंवा छायाचित्रांवर विश्वास ठेऊ नये. नागरिकांनी घाबरून न जाता काळजी घ्यावी.
> **-अनिल राठोड,** नियतक्षेत्र वन अधिकारी

# शहरातील दिव्यांग नागरिकांची होणार अचूक नोंद

## दिव्यांग सर्वेक्षणासाठी आशा सेविकांना विशेष प्रशिक्षण

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड महापालिका आणि दिव्यांग भवन यांच्या वतीने शहरातील दिव्यांग नागरिकांची अचूक नोंद घेण्यासाठी व्यापक सर्वेक्षण मोहीम महात्मा गांधी सेवा संघ यांच्या सहकार्याने राबवण्यात येत आहे. आशा सेविकांच्या माध्यमातून हे सर्वेक्षण करण्यात येणार असून या अनुषंगाने नुकतेच आशा सेविकांना विशेष प्रशिक्षण देण्यात आले.**



महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व उपायुक्त ममता शिंदे यांच्या अधिपत्याखाली हे प्रशिक्षण निगडी येथील ग.दि. माडगूळकर सभागृहात पार पडले. याप्रसंगी समाजकल्याण विभागाच्या सहाय्यक आयुक्त निवेदिता घार्गे, सहाय्यक आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ.अंजली ढोणे, महात्मा गांधी सेवा संघाचे प्रकल्प संचालक विजय कान्हेकर, डॉ. वर्षा गट्टू, डीईआयसी पुणे येथील डॉ. प्रज्ञा गावंडे, डॉ. कल्याणी मांडके, दिव्यांग भवनचे मुख्य कार्यकारी अधिकारी परेश गांधी यांच्यासह महापालिकेचा समाज विकास विभाग, दिव्यांग भवन येथील अधिकारी, कर्मचारी तसेच आशा सेविका उपस्थित होत्या.

प्रशिक्षणामध्ये आशा सेविकांना सर्वेक्षणाला गेल्यानंतर दिव्यांग व्यक्तींची ओळख कशी करावी, त्यांच्याशी संवेदनशीलतेने संवाद कसा साधावा, डिजिटल ॲपच्या मदतीने दिव्यांगाची माहिती कशा पद्धतीने नोंदवावी, याबाबत सविस्तर प्रशिक्षण देण्यात आले. दिव्यांग हक्क कायदा २०१६ नुसार केंद्र शासन, राज्य शासन व स्थानिक प्रशासनाने स्थानिक स्तरावर दर ५ वर्षांनी दिव्यांगांचे सर्वेक्षण करणे गरजेचे आहे.

२०१६ च्या कायद्याच्या अगोदर फक्त ७ प्रकारचे दिव्यांगत्व दृष्टिक्षेपात घेतलेले होते. परंतु सद्य परिस्थितीत २०१६ च्या कायद्यानुसार २१ प्रकारचे दिव्यांगत्व निदर्शनास आणलेले आहेत. त्या अनुषंगाने दिव्यांग व्यक्तींच्या सर्वेक्षणाला गेल्यानंतर त्यांच्या दिव्यांगत्वाचा प्रकार नमूद करण्यासोबतच इतर माहिती कशा पद्धतीने संकलित करण्यात यावी, याची माहितीही यावेळी देण्यात आली.

> दिव्यांग व्यक्तींच्या सर्वेक्षणाचा उद्देश केवळ आकडेवारी गोळा करणे हा नसून त्यांच्या जीवनमानात सुधारणा घडविणे हा आहे. या सर्वेक्षणाच्या माध्यमातून प्रत्येक दिव्यांगापर्यंत शासनाच्या योजना व सुविधा पोहोचतील. समाजातील सर्व घटकांचा विकास होणे महत्त्वाचे असून पिंपरी चिंचवड महापालिका दिव्यांग नागरिकांच्या सशक्तीकरणासाठी असे उपक्रम राबवत आहे.
> **-शेखर सिंह,** आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महापालिका



## भूमिका

**लडाखमधील शांततेवर गुरुवारी हिंसाचाराचा ओरखडा उमटला. भाजपचे कार्यालय पेटवले गेले, चार आंदोलकांनी जीव गमावला आणि साधारण ६० जण जखमी झाले. केंद्रीय गृह मंत्रालयाच्या पत्रकातून आणि भाजपच्या नेत्यांकडून या हिंसाचाराला पर्यावरण कार्यकर्ते सोनम वांगचुक आणि स्थानिक काँग्रेस नेते फुन्त्साँग स्टेन्झिंग त्सेपांग यांची चिथावणीखोर भाषणे कारणीभूत असल्याचे आरोप करण्यात आले आहेत.**

# हिंसा अयोग्यच; पण का झाली?



सरकार चर्चेस तयार असूनही उतावीळपणा केला गेला, असे चित्र निर्माण केले जात आहे. पण त्यात तथ्य असू शकते का?गुरुवारी जो हिंसाचार उसळला, तो केवळ गेल्या १५ दिवसांत झालेल्या आंदोलनाचा परिणाम नव्हता. २०१९ मध्ये जम्मू आणि काश्मीरचे विभाजन होऊन त्यातून लडाख हा स्वतंत्र केंद्रशासित प्रदेश निर्माण करण्यात आला. त्यानंतर ऑक्टोबर २०२० मध्ये झालेल्या 'लडाख ऑटोनॉमस हिल कौन्सिल' या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत भाजपने लडाखला राज्याचा दर्जा देण्याचे आश्वासन दिले होते. ते पूर्ण होत नाही हे पाहून गेल्या पाच वर्षांत वारंवार आंदोलने करण्यात आली.सोनम वांगचुक यांच्या नेतृत्वाखाली दिल्लीपर्यंत पदयात्राही काढली गेली. आता हिल कौन्सिलची पुढची निवडणूक अगदी तोंडावर आली आहे. येत्या ऑक्टोबरमध्ये ती होऊ घातली आहे. तरीही राज्याचा दर्जा देण्याच्या दिशेने एकही पाऊल उचलण्यात आलेले नाही. कालचा हिंसाचार हा या पाच वर्षांच्या सहनशीलतेचा अंत होता.लडाखवासीय राज्याच्या दर्जाएवढेच किंबहुना काहीसे अधिकच आग्रही आहेत, ते घटनेच्या सहाव्या परिशिष्टात समावेशासाठी. अनुच्छेद ३७० लागू होता, तोपर्यंत लडाखमधील जमिनींच्या खरेदी-विक्रीवर हिल कौन्सिलचे मोठ्या प्रमाणात नियंत्रण होते. आता हे कवच नाहीसे झाले आहे. त्यामुळे आदिवासीबहुल भागांना विशेष अधिकार देणाऱ्या घटनेच्या सहाव्या परिशिष्टात लडाखचा समावेश करण्यात यावा, अशी स्थानिकांची मागणी आहे.पर्यावरणीयदृष्ट्या अतिशय संवेदनशील असलेला आपला भूभाग सुरक्षित राहावा, तिथले हवा-पाणी प्रदूषित होऊ नये, खाणींनी हिमालय पोखरला जाऊ नये, देशाच्या कुठल्या तरी भलत्याच भागासाठी वीजनिर्मिती करण्याची जबाबदारी लडाखवर लादून इथल्या मेंढपाळांच्या उदरनिर्वाहावर गदा आणली जाऊ नये यासाठी त्यांना परिशिष्ट-६चे कवच हवे आहे. ही मागणीदेखील अद्याप पूर्ण करण्यात आलेली नाही. तरुणांतील संतापाच्या मुळाशी आहे बेरोजगारी. लडाख हा जम्मू-काश्मीरचा भाग होता, तेव्हा राज्य लोकसेवा आयोगाच्या नोकरभरती प्रक्रियेतून काही प्रमाणात तरी संधी उपलब्ध होत्या. मात्र २०१९ पासून इथे राज्य लोकसेवा आयोगच अस्तित्वात नाही. त्यामुळे सुमारे पाच हजार पदे रिक्त आहेत आणि नोकरीच्या प्रतीक्षेत तरुणांचे वय उलटून चालले आहे.असे अस्तित्वाशी निगडित असलेले प्रश्न घेऊन लडाखवासीयांनी गेली पाच वर्षे शांततापूर्ण लढा दिला, पण हिंसेचा मार्ग आजवर स्वीकारला नव्हता. या वेळी आंदोलनाला १५ दिवस झाले होते. त्यात गृह मंत्रालयाने पुढील चर्चेसाठी सहा ऑक्टोबर ही तारीख निश्चित केली. उपोषणाला बसलेल्या वयोवृद्धांची प्रकृती खालावू लागली होती. त्यात मंगळवारी दोघांना रुग्णालयात दाखल करण्याची वेळ आली. पाच वर्षांत एकही मागणी पूर्ण झालेली नाही आणि उपोषणकर्त्यांच्या जिवाचीही सरकारला किंमत नाही, अशी भावना निर्माण झाली आणि हिंसा उफाळून आली.आता सरकारने सोनम वांगचुक यांच्या संस्थेचा परदेशी योगदान (नियमन) कायद्यांतर्गत देण्यात आलेला परवाना रद्द केला आहे. भाजप नेते अमित मालवीय यांनी काँग्रेसवर शरसंधान करत राहुल गांधींना अशाच स्वरूपाचा असंतोष अभिप्रेत होता, अशी टीका केली आहे. सरकारचे म्हणणे खरे आहे असे मानले, तरी मूळ प्रश्न सुटतो का? राज्याचा दर्जा देण्याच्या मार्गात वांगचुक, फुन्त्साँग त्सेपांग, राहुल गांधी, असल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली, पण ही सुशिक्षित बेरोजगार 'जेन-झी'ची प्रतिक्रिया आहे, हे नमूद करण्यासही ते विसरले नाहीत. ही पिढी कोणते टोक गाठू शकते, नाही. लडाखमधील हिंसाचारावर काश्मिरातून उमटलेल्या प्रतिक्रिया तिथे काय धुमसत आहे, यावर लख्ख प्रकाश टाकणाऱ्या आहेत. या दोन्ही केंद्रशासित प्रदेशांचे प्रश्न अनंत काळासाठी प्रलंबित ठेवता येणार नाहीत.

## संपादकीय »

### हेडमास्तरांचे हरपणे!

***ते केवळ कर्तव्यकठोर असते, तर कदाचित रसिकप्रिय झाले असते पण खेळाडूंच्या मर्जीतून उतरले असते. तशी परिस्थिती अजिबातच नव्हती.***

हेरॉल्ड 'डिकी' बर्ड आज हयात असते नि क्रिकेटच्या मैदानावर सक्रिय पंचगिरी करते, तर त्यांनी परवा भारत आणि पाकिस्तानच्या क्रिकेटपटूंना परस्परांशी हस्तांदोलन करण्यास भाग पाडले असते. त्यांचा दरारा आणि त्यांच्याविषयीचे प्रेम आजही तितकेच असते, तर त्यांचा हा विनंतीवजा आदेश शिरसावंद्य मानून हस्तांदोलनाचे सोपस्कार पार पडलेही असते. किंबहुना, 'डिकी बर्ड पंच आहेत' या जाणिवेतून संबंधित नाट्यच घडले नसते. आज क्रिकेटच्या मैदानावर डिकी बर्ड नाहीत, आता तर ते हयातही नाहीत. जे कोणी सज्जन प्रस्तुत आशिया चषकात पंचगिरीसाठी उभे आहेत त्यांची नावेही बहुतांना ठाऊक नाहीत.कदाचित लवकरच सदेह, सजीव पंचांची गरजही उरणार नाही. ती जबाबदारीही 'एआय'कडे सरकवली जाईल. बिनचेहऱ्याचे,पंच हे बदलत्या क्रिकेटचे वास्तव ठरू लागले आहे.

नैसर्गिक आपत्तीत पाहणी-पंचनाम्याचे आदेश दिले जातात. मदतीबाबत कोट्यवधींचे आकडे जाहीर केले जातात. परंतु या केवळ तोंडदेखल्या औपचारिक घोषणा असल्याचा अनुभव शेतकऱ्यांना दरवर्षीच येतो.खरे तर सप्टेंबर-ऑक्टोबर हे खरीप सुगीचे आणि सणवारांचे महिने आहेत.

# आपत्तीग्रस्तांना भरपाई जाहीर होईल



खरिपातील पीके हाती आलेली असतात. त्यातून सणावारांचा आनंद द्विगुणीत होतो. परंतु या वर्षी शेतीशिवारात पावसाने थैमान घातले असून, शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला आहे. यावर्षीची ही काही पहिलीच आपत्ती नाही. जुलै, ऑगस्ट आणि आता सप्टेंबर या तिन्ही पावसाळी महिन्यात अतिवृष्टीने पिकांची अक्षरश: राखरांगोळी केली. अनेक ठिकाणी काढणीला आलेले सोयाबीन पाण्यात आहेत. कापसाची बोंडे शेतात साचलेल्या पाण्यात सडत आहेत. नदी-नाले परिसरात पिकांबरोबर शेतातील माती एवढेच नव्हे, तर ट्रॅक्टर, कडबा, कुट्टी, सोलर पंप, खते तसेच धान्याची पोती, सूक्ष्म सिंचन संच आदी साहित्य पुराच्या पाण्यात डोळ्यांदेखत वाहून गेले आहे. काही ठिकाणी तर जीवितहानीही झाली आहे. त्यामुळे झालेल्या नुकसानीचा आकड्यांत अंदाज बांधणे कठीण आहे. मराठवाड्यासह अहिल्यानगर, सोलापूर, तसेच काही प्रमाणांत जळगाव यांसारख्या भागांनाही जबरदस्त तडाखा बसला आहे. राज्यभरात खरिपाचे क्षेत्र १४४ लाख हेक्टर असून, त्यांपैकी सुमारे १३५ लाख हेक्टरवर पेरा होता. त्यातील २६ लाख हेक्टर (२० टक्के क्षेत्र) अतिवृष्टीने पुरते बाधित झाले आहे. शेतकऱ्यांचे वैयक्तिक नुकसान तर झाले आहेच, पण त्याचबरोबरच राज्याच्या अर्थव्यवस्थेचीही मोठी हानी झाली आहे.लहरी पर्जन्यमानाचा जबरदस्त फटका यावेळी मराठवाड्याला बसला असून, त्यामुळे झालेली जीवितहानी, आर्थिक नुकसान, पशुधनाची हानी, विस्थापन हे सारेच अतिशय गंभीर स्वरूपाचे आहे. राज्यभरातील मुसळधार पावसाची दखल घेत राज्य सरकारने आतापर्यंत दोन हजार २१५ कोटी रुपयांची तातडीची मदत मंजूर केली आहे. तसेच संबंधित पालकमंत्र्यांनी व लोकप्रतिनीधींनी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या बांधांवर जाऊन प्रत्यक्ष परिस्थिती जाणून घेण्याचे राज्य सरकारने आदेश दिले आहेत. वास्तविक, मराठवाड्यात ओला दुष्काळ जाहीर केला तर या भागातील शेतकऱ्यांना दिलासा मिळेल. गेली काही वर्षे पावसाअभावी तळमळणाऱ्या मराठवाड्याने अशा प्रकारच्या संकटाची कल्पनाही केली नव्हती; यावर्षी मात्र अतिवृष्टीने अचानक या भागाला जेरीस आणले. या पावसाने धरणे, तलाव, नद्यांचे काठ ओलांडून पाणी शिवारात शिरल्याने प्रचंड आर्थिक नुकसान झाले आहे. हजारो हेक्टरवरील पिके उद्ध्वस्त झाली. कापूस, सोयाबीन, मका, ऊस, उडीद, मूग, कांदा अशा प्रमुख पिकांसह बागायती फळपिकेही नष्ट झाली आहेत. शेतात पाणी साचून राहिल्याने पीके अक्षरश: सडली आहेत. काही भागात दोनदा पेरणी करूणही वाया गेली.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

पूरग्रस्तांना धान्याचे वाटप

## पूरग्रस्त गावांना ३५ टँकरद्वारे पाणीपुरवठा

# सोलापुरातील पूरग्रस्तांना धान्याचे वाटप

| मुंबई |

प्रतिनिधी : महाईन्यूज

**सोलापूर जिल्ह्यातील पूरग्रस्त ८८ गावांतील ग्रामस्थांना १० किलो गहू, १० किलो तांदूळ मोफत वाटप केले जाणार आहेत. सीना नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. ग्रामस्थांनी पोलीस, महसूल प्रशासनाच्या सूचनांचे पालन करून सहकार्य करावे, असे आवाहन सोलापूर जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले आहे. तर, पूरग्रस्त गावांत ३५ टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू केला आहे. तसेच ८८ गावांत स्वच्छता, आरोग्य सेवा, पाणीपुरवठा आदी सुविधा पूर्ववत करणार असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी दिली.**

## ८८ गावांतील ग्रामस्थांना १० किलो गहू



सोलापूर जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी सोलापूर येथे पूरस्थिती आणि पुढील कारवाईबाबतची माहिती देण्यासाठी पत्रकार परिषदेचे आयोजन केले होते. या वेळी पुढे बोलताना जिल्हाधिकारी यांनी, २१ सप्टेंबर रोजी अहिल्यानगर, धाराशिव येथे मोठ्या प्रमाणत पाऊस पडला. त्याचा परिणाम सीना नदीत पाणी मोठ्या प्रमाणात आले.

या पुराच्या पाण्यामुळे सोलापूर जिल्ह्यातील करमाळा, माढा, मोहोळ या तालुक्याना बसला. जिल्ह्यात ६ तालुके पुराने बाधित झाले आहेत. या वेळी नागरिकांना पोलीस, महसूल प्रशासनाने सुरक्षित ठिकाणी जाण्याचे आवाहन केले. मात्र, काही नागरिकांनी स्थलांतर न केल्याने प्रशासनाला त्यांना शोधून त्यांचा बचाव करून सुरक्षित ठिकाणी आणावे लागले. आता पुढील चार दिवस सतर्कतेचा इशारा दिला आहे. नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करावे.

असे आवाहन जिल्हाधिकारी यांनी केले. या पूरग्रस्तांच्या बचाव कार्यासाठी एनडीआरएफची ३, तर लष्कराची १ टीम मदतीला होती. यासह २५ बोटी, १५० मनुष्यबळ यांच्या मदतीने बचाव कार्य केल्याची माहिती त्यांनी दिली.पूरग्रस्त ८८ गावांतील ग्रामस्थांना १० किलो गहू, १० किलो तांदूळ मोफत वाटप केले जाणार आहे.

पूरग्रस्तांना मदतीसाठी अनेक संस्था पुढे आल्या आहेत. जनतेमधून मदत करायची असेल, तर तालुकास्तरीय किंवा जिल्हास्तरीय परवानगीची गरज नाही. नागरिकांनी गहू पीठ, मच्छर अगरबत्तीमग, बिस्कीट पॅकेट, फूड पॅकेट, चादर, ज्वारीचे पीठ, हरभरा डाळ, मीठ, मसाला, हळद, तेल, सतरंजी, मिल्क पावडर आदी वस्तू द्याव्यात जेणेकरून नागरिकांना तत्काळ उपयोगात येतील

### १ हजार टन चारा उपलब्ध

जिल्हा परिषेदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी, पूरग्रस्त ८८ गावात ३५ टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू केला आहे. गरजेनुसार वाढवून पाण्याची व्यवस्था केली आहे. तसेच पाणी पूर्णपणे ओसरले, की विद्युतपुरवठा पूर्ववत केला जाईल. गावातील पाणीपुरवठा, पाणीपुरवठा योजना सुरू केली जाईल, अशी माहिती त्यांनी दिली. जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न मार्गी लावला आहे. जिल्ह्यासह इतर जिल्ह्यांतून जवळपास १ हजार टन चारा उपलब्ध केला.

---

# कृष्णा कारखान्याची वार्षिक सभा खेळीमेळीत संपन्न

## कृष्णा कारखान्याची पाणी योजना आधुनिकीकरणाकडे – डॉ. सुरेश भोसले

| मुंबई |

प्रतिनिधी : महाईन्यूज

**कृष्णा सहकारी साखर कारखान्याकडून शेतीमध्ये एआय तंत्रज्ञानाचा वापर करून उत्पन्न वाढीवर भर दिला जाईल, अशी घोषणा कृष्णा साखर कारखान्याचे अध्यक्ष डॉ. सुरेश भोसले यांनी केली. लवकरच कारखाना मालकीच्या आणि पुरस्कृत उपसा जलसिंचन योजनांचे आधुनिकरण करणार आहेत. याला शासनाचा मदतीचा हात मिळाला तर शेतकऱ्यांना कमीत कमी पाणीपट्टी भरावी लागेल असा मोठा दिलासा सभासदांना त्यांनी यावेळी दिला.**




य. मो. कृष्णा सहकारी साखर कारखान्याच्या ६९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ते बोलत होते. कृष्णा बँकेचे अध्यक्ष आ. डॉ. अतुल भोसले, माजी आमदार भगवानराव साळुंखे, उपाध्यक्ष जगदीश जगताप, संचालक लिंबाजी पाटील, जितेंद्र पाटील, दिपकराव पाटील, संजय पाटील, अविनाश खरात, संभाजी पाटील प्रमुख उपस्थित होते. कार्यकारी संचालक बाजीराव सुतार यांनी विषय पत्रिकेचे वाचन केले.

डॉ. सुरेश भोसले म्हणाले, कृष्णा कारखान्याने गेल्या दहा वर्षात सभासदांच्या हिताचे अनेक महत्वपूर्ण निर्णय घेतले. यावर्षी उच्चांकी दर दिला. त्यामुळे सभासद समाधानी आहेत. मयत ५ हजाराहून अधिक सभासदांचे शेअर्स हस्तांतरित केले आहेत. राहिलेलेही कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतर लवकरच करू. ज्या सभासदांनी अन्य विल्हेवाट करून ऊस घातला त्या सभासदांनाही मोफत साखर दिली जाईल. कारखान्याने या हंगामाच्या गाळपाची पूर्ण तयारी केली आहे. शासनाने परवानगी दिल्यानंतर गाळप सुरू केले जाईल. कृष्णा सहकारी साखर कारखान्याने विस्तारीकरण केल्याने कारखान्याची गाळप क्षमता साडेसात हजारावरून साडेबारा हजार टनापर्यंत गेली. त्यामुळे वेळेत ऊस जाण्यास मदत होणार आहे. गरज पडल्यास आणखी विस्तारीकरण करू. आ. डॉ. अतुल भोसले म्हणाले, गेल्या दहा वर्षात संचालक मंडळांने केलेल्या पारदर्शक कारभारामुळे कृष्णा कारखाना ऊस दरात राज्यात अव्वल आहे. आता कारखान्याची निवडणूक लागणार असल्याने काहीजण कारखान्यावर कर्ज झाले आहे असा खोटा प्रचार करीत आहेत. त्यांच्या भूलथापांना बळी पडू नका. माजी अध्यक्षांनी कारखान्याची काळजी करू नये, त्यांनी त्यांच्या कारकिर्दीत काय दिवे लावले ते आधी पहावे. कारखाना कार्यक्षेत्रातील सर्व गावातील पाणंद रस्त्यांचे प्रश्न मार्गी लावणार आहे. पाणी योजनांचे कारखाना आधुनिकरण करणार आहे..

### दिलासा देणारी आकडेवारी...

कारखान्याचे यापूर्वीचे सत्ताधारी आम्ही काय केले असे विचारत आहेत. त्यांना मी सांगू इच्छितो, कारखान्याने दहा वर्षात एफआरपी पेक्षा १३४ कोटी रुपये जादा शेतकऱ्यांना दिले आहेत. शिवाय ६९ कोटी रुपयांची मोफत साखर वाटली आहे. भविष्यातही कारखाना सभासद हिताचे अधिक चांगले निर्णय घेईल. एफआरपीपेक्षा जादा दर दिल्याने कारखान्याला आयकर विभागाची नोटीस आली होती. त्यांच्या म्हणण्यानुसार, कारखान्याने दहा वर्षात एफआरपीपेक्षा एकशे चोपन्न कोटी रुपयांपेक्षा जास्त दर शेतकऱ्यांना दिला.एकोणसत्तर कोटी रुपयांची मोफत साखर वाटप करण्यात आली. एफआरपीपेक्षा जादा दर दिल्यामुळे आलेली आयकर विभागाची पाचशे कोटी रुपयांची नोटीस केंद्र सरकारच्या हस्तक्षेपामुळे रद्द झाली.

मुख्यमंत्र्यांची पंतप्रधानांशी चर्चा

## नुकसानीबाबत मुख्यमंत्र्यांची पंतप्रधानांशी चर्चा

# दोन आठवड्यांत मदतीचा प्रस्ताव?

| नवी दिल्ली |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**राज्यातील काही जिल्ह्यांत प्रामुख्याने मराठवाडा तसेच, सोलापूर जिल्ह्यातील अतिवृष्टीमुळे झालेल्या शेतकऱ्यांच्या नुकसानीची माहिती देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. राज्याचा प्रस्ताव आल्यानंतर भरीव आर्थिक मदत देण्याचे आश्वासन मोदींनी दिल्याचे फडणवीस यांनी पत्रकारांना सांगितले. पुढील दोन आठवड्यांमध्ये हा प्रस्ताव केंद्राला सादर केला जाण्याची शक्यता आहे.**

## आपत्ती निवारण निधीतून मदत



राज्याला राष्ट्रीय आपत्ती निवारण निधीतून मदत मिळावी, अशी मागणी राज्य सरकारने केंद्र सरकारकडे पत्राद्वारे केली आहे. त्या संदर्भातील पत्र केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना गुरुवारी मुंबईमध्ये देण्यात आले. या पत्रावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. शहा यांच्याशी चर्चा केल्यानंतर दुसऱ्याच दिवशी, शुक्रवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्लीत येऊन पंतप्रधान मोदींची भेट घेतली.राज्य आपत्ती निवारण निधीतून शेतकऱ्यांना राज्य सरकारने २ हजारांहून अधिक कोटींची तातडीची मदत दिली असली तरी, अतिवृष्टीने झालेले नुकसान पाहता केंद्राच्या भरीव निधीची गरज असल्याचे फडणवीस यांनी सांगितले. अजून आढावा घेण्याचे काम पूर्ण झालेले नसल्याने नुकसानीचा नेमका आकडा सांगता येणार नाही. शिवाय, येत्या दोन दिवसांमध्ये (२७-२८ सप्टेंबर) पुन्हा अतिवृष्टी होण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. केंद्राला एकदाच प्रस्ताव द्यावा लागतो, त्यानंतर त्यामध्ये बदल करता येत नाही. शेतीच्या नुकसानीचा पूर्ण आढावा घेऊन राज्याकडून केंद्राला प्रस्ताव सादर केला जाईल, अशी माहिती फडणवीस यांनी दिली.शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचे आश्वासन राज्य सरकार पूर्ण करेल पण, आत्ता शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत देण्याला राज्य सरकारचे प्राधान्य राहील. कर्जमाफीसंदर्भात घोषणापत्रात आश्वासन दिले आहे, त्याची पूर्तता केली जाईल. त्यासाठी समिती नेमण्यात आली आहे. कर्जमाफी वारंवार करता येत नाही, त्यामुळे कर्जमाफीचे धोरण प्रभावीपणे अमलात येण्याच्या दृष्टीने अभ्यास केला जात आहे, असे फडणवीस म्हणाले.माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी गुरुवारी मराठवाडा दौरा करून पूरपरिस्थितीचा व शेतकऱ्यांच्या नुकसानीची पाहणी केली होती. पंतप्रधान मोदींनी मराठवाड्याचा दौरा करावा व केंद्राने पुरेसा

## नरेंद्र मोदी यांची भेट घेतली

राज्य आपत्ती निवारण निधीतून शेतकऱ्यांना राज्य सरकारने २ हजारांहून अधिक कोटींची तातडीची मदत दिली असली तरी, अतिवृष्टीने झालेले नुकसान पाहता केंद्राच्या भरीव निधीची गरज असल्याचे फडणवीस यांनी सांगितले. अजून आढावा घेण्याचे काम पूर्ण झालेले नसल्याने नुकसानीचा नेमका आकडा सांगता येणार नाही. शिवाय, येत्या दोन दिवसांमध्ये (२७-२८ सप्टेंबर) पुन्हा अतिवृष्टी होण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.


निधी दयावा तसेच, एकरी ५० हजार रुपयांची मदत द्यावी अशी मागणी ठाकरे यांनी केली. त्यावर, पूरपरिस्थितीची पाहणी करण्यासाठी मोदींचा राज्यात दौरा होणार नसल्याचे फडणवीस यांनी सांगितले. उद्धव ठाकरे यांनी आर्थिक मदत देण्यासंदर्भात राज्य सरकारला शहाणपण सांगू नये, असा टोलाही फडणवीस यांनी मारला.करोनाच्या काळात 'पीएम मदत निधी'सारखा फंड तयार करण्याची परवानगी केंद्र सरकारने ठाकरेंच्या सरकारला दिली होती. ६०० कोटी रुपये फंडात जमाही झाले पण, उद्धव ठाकरेंच्या तत्कालीन सरकारला एक पैसादेखील खर्च करता आला नाही. आता हा फंड इतरत्र वापरता येत नाही. या फंडाचे काय करायचे हा राज्य सरकारसमोर प्रश्न निर्माण झाला आहे. ६०० कोटी लोकांनी दिले असताना, लोकांचा करोनाने मृत्यू होत असताना एक पैसादेखील खर्च करता न आलेल्यांनी किती शहाणपण शिकवावे हे त्यांनीच ठरवावे, अशी चपराक फडणवीस यांनी लगावली.राज्याला राष्ट्रीय आपत्ती निवारण निधीतून मदत मिळावी, अशी मागणी राज्य सरकारने केंद्र सरकारकडे पत्राद्वारे केली आहे. त्या संदर्भातील पत्र केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना गुरुवारी मुंबईमध्ये देण्यात आले. या पत्रावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शहा यांच्याशी चर्चा केल्यानंतर दुसऱ्याच दिवशी, शुक्रवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्लीत येऊन पंतप्रधान मोदींची भेट घेतली.

## FIR दाखल होताच खात्यातून काढले ५० लाख

# स्वयंघोषित बाबा चैतन्यानंदबद्दल धक्कादायक माहिती समोर

| नवी दिल्ली |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**स्वयंघोषित स्वामी चैतन्यानंद सरस्वती याच्यावर दिल्लीतील आश्रमात शिकणाऱ्या १७ विद्यार्थिनींनी लैंगिक छळाचे आरोप केले. त्या संदर्भात तक्रार प्राप्त झाल्यानंतर पोलिसांनी त्याच्याविरोधात गुन्हा दाखल केला. मात्र, अटक वॉरंट निघताच स्वामी चैतन्यानंद सरस्वती फरार झाला. १७ विद्यार्थिनींनी कलेले आरोप स्वयंघोषित स्वामी चैतन्यानंद सरस्वती याच्यावर करण्यात आले आहेत.**



या आरोपांची यादी जेवढी मोठी आहे तितकेच आरोपांचे स्वरूप गंभीर आहे.या चैतन्यानंद सरस्वती याच्याविरोधात एफआयआर दाखल झाल्यानंतर आता या आरोपीने आर्थिक पार्श्वभूमी कमकुवत असलेल्या विद्यार्थिनींचा कशा पद्धतीने लैंगिक छळ केला, त्यांच्यावर कशी पाळत ठेवली आणि त्यांनी विरोध केला तर त्यांना कशा पद्धतीने फेल करण्याची धमकी दिली याबद्दल धक्कादायक माहिती समोर येत आहे. .या स्वयंघोषित बाबच्या विरोधात

## वेगवेगळ्या नावांनी बँक खाती

फरार असलेल्या चैतन्यानंद यांच्या वतीने अटकपूर्व जामीन अर्ज देखील दाखल करण्यात आला होता. मात्र, त्यांच्याविरुद्ध दाखल असलेल्या आर्थिक अनियमिततेच्या एका प्रकरणात दिल्ली न्यायालयाने शुक्रवारी हा जामीन अर्ज फेटाळला. या बाबाच्या विरोधात तपास सुरू असतना त्याने कथितपणे दोन वेगवेगळ्या नावांनी बँक खाती उघडली असल्याचे आढळून आले आहे.

तपास सुरू केल्यानंतर, यंत्रणांना आढळून आले आहे की चैतन्यानंद याने बँक खाती चालवण्यासाठी कथितपणे वेगवेगळी नावे आणि माहिती वापरत होता, पीटीआयने यासंबंधी वृत्त दिले आहे. इतकेच नाही तर त्याच्या विरोधात एफआयआर दाखल झाल्यानंतर त्यानेझालेल्या लैंगिक छळ आणि धमक्यांविषयीच्या घटनांबद्दल सांगितल्याचे एका खासगी मॅनेजमेंट इंस्टिट्यूटच्या प्रशासनाने कळवल्यानंतर चैतन्यानंद याच्या विरोधात ४ ऑगस्ट रोजी एफआयआर दाखल करण्यात आला होता.



# नवरात्रीचा सातवा दिवस कालरात्रि देवीचा!

संपूर्ण देशभरात शनिवारी नवरात्रीचा सातवा दिवस साजरा केला जाणार आहे. नवरात्रीच्या सातव्या दिवशी दुर्गामातेचे सातवे रुप देवी कालरात्रिची पूजा करण्याची परंपरा आहे. कालरात्रि देवी दुष्टांचा नाश करण्यासाठी ओळखली जाते. यामुळेच तिला कालरात्रि नावाने ओळखले जाते. देवी आपल्या भक्तांना नेहमी सुख-समृद्धीचा आशीर्वादचा देते. कालरात्रि देवीची उपासना केल्याने भय आणि रोग नष्ट होतात. याशिवाय, भूतबाधा आणि अकाली मृत्यू टळतो, असे मानले जाते.

## कालरात्री देवीचे रुप

» कालरात्री देवीचे शरीर काळ्या रंगाचे आहे. शुंभ, निशुंभ आणि रक्तबीजचा नाश करण्यासाठी दुर्गामातेने कालरात्रिचे रुप धारण केले होते. देवीच्या श्वासातून अग्नी निघतो आणि तिच्या गळ्यात चमकणारी माळ आहे. देवीला चार हात आहेत असून एका हातात तलवार, दुसऱ्या हातात लोखंडी शस्त्र, तिसऱ्या हातात अभय मुद्रा आणि चौथ्या हातात वरमुद्रा आहे. दुर्गामातेचे हे रुप पापांचा नाश करण्यासाठी आहे. ती भक्तांकडे करुणेने पाहत आहे.



## पूजेची पद्धत

» शारदीय नवरात्रीच्या सातव्या दिवशी सकाळी लवकर उठून अंघोळ करावी. आंघोळीनंतर देवीसमोर तुपाचा दिवा लावा. देवीला लाल रंगाची फुले अर्पण करा. देवी कालरात्रिच्या पूजेसाठी मिठाई, पाच ड्रायफ्रुट्स, पाच फळे, धूप, फुले आणि गुळाचा नैवेद्य तयार करावा. या दिवशी गुळाला विशेष महत्त्व दिले जाते. कालरात्रीला गूळ किंवा त्यापासून बनवलेले पदार्थ अर्पण करावे. पूजा संपल्यानंतर देवीच्या मंत्रांचा जप करावा.

## आशिया चषक २०२५

## निसांकाच्या शतकानंतरही श्रीलंकेचा पराभव

# सुपर ओव्हरमध्ये पहिल्या चेंडूवर विजय!

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आशिया चषक २०२५ मध्ये श्रीलंका आणि भारत यांच्यात अखेरच्या सामन्यात सुपर ओव्हर खेळवली गेली आणि भारताने सुपर ओव्हरमधील पहिल्याच चेंडूवर विजय मिळवला. या विजयासह टीम इंडिया या स्पर्धेत अजेय राहिली आहे. आशिया चषक फायनलचे दोन्ही संघ ठरले असल्याने हा सामना तसा फारसा महत्त्वाचा नव्हता. पण श्रीलंकेच्या संघाने भारताला फायनलपूर्वीच्या सामन्यात तगडी टक्कर दिली आहे. अखेरीस भारताने उत्कृष्ट कामगिरी करत विजय मिळवला. अर्शदीपची या सामन्यातील गोलंदाजी सामन्याचा टर्निंग पॉईंट ठरली.**

## अर्शदीपची भेदक गोलंदाजी



अखेरच्या षटकात श्रीलंकाला विजयासाठी ६ चेंडूत १२ धावांची गरज होती. हर्षित राणाकडे गोलंदाजीची जबाबदारी होती. हर्षितने पहिल्याच चेंडूवर शतकवीर निसांकाला झेलबाद केलं. यानंतर दुसऱ्या चेंडूवर २ धावा, तिसऱ्या चेंडूवर बायची १ धाव, चौथ्या चेंडूवर २ धावा दिल्या. तर पाचव्या चेंडूवर शनाकाने चौकार मारला. यानंतर अखेरच्या चेंडूवर दोन धावा घेण्यात आल्या. शनाकाने दुसरी धाव घेत तो स्ट्राईकर एन्डला डाईव्ह मारत झोपून राहिला. जर शनाका उठला असता तर तिसरी धाव झाली असती कारण भारताचे खेळाडू घाईघाईत चेंडू टिपण्यात चुकले होते. त्यामुळे सामना बरोबरीत राहिला आणि सुपर ओव्हरमध्ये सामना गेला.सुपर ओव्हरमध्ये भारताकडून अर्शदीप सिंग गोलंदाजी करत होता. त्याच्या पहिल्याच चेंडूवर कुसल परेरा झेलबाद झाला. यानंतर कुसल मेंडिस फलंदाजीला आला. त्याने पुढच्या चेंडूवर शनाकाला स्ट्राईक दिली. तिसरा चेंडू निर्धाव राहिला. चौथ्या चेंडू वाईड राहिला. यानंतर चौथ्या चेंडूवर झेलबादचं अपील भारताने केलं आणि संजूने लगेच धावबाद देखील केलं. यानंतर पंचांनी झेलबादसाठी निर्णय दिल्याने शनाकाने रिव्ह्यू घेतला आणि तो नाबाद राहिला.

त्यामुळे संजूने केलेलं धावबाद होईपर्यंत चेंडू डेड झाला होता. यासह भारताला विजयासाठी ३ धावांचं लक्ष्य देण्यात आलं.भारताकडून फलंदाजीला शुबमन गिल आणि सूर्यकुमार यादवची जोडी मैदानात आली. श्रीलंकेकडून हसरंगा गोलंदाजीला आला होता. सूर्यादादाने पहिल्याच चेंडूवर कमालीचा कव्हर ड्राईव्ह खेचला आणि गिलबरोबर त्याने ३ धावा काढत पहिल्याच चेंडूवर विजय मिळवला.भारताने श्रीलंकेला विजयासाठी २०३ धावांचं लक्ष्य दिलं होतं. श्रीलंकेने प्रत्युत्तरात पहिल्या षटकात पहिली विकेट गमावली. पण यानंतर पथुम निसांका व कुसल

## अखेरच्या चेंडूवर दोन धावा

अखेरच्या षटकात श्रीलंकाला विजयासाठी ६ चेंडूत १२ धावांची गरज होती. हर्षित राणाकडे गोलंदाजीची जबाबदारी होती. हर्षितने पहिल्याच चेंडूवर शतकवीर निसांकाला झेलबाद केलं. यानंतर दुसऱ्या चेंडूवर २ धावा, तिसऱ्या चेंडूवर बायची १ धाव, चौथ्या चेंडूवर २ धावा दिल्या. तर पाचव्या चेंडूवर शनाकाने चौकार मारला. यानंतर अखेरच्या चेंडूवर दोन धावा घेण्यात आल्या.

परेरा यांनी शतकी भागीदारी रचत भारताच्या गोलंदाजांची शाळा घेतली. पथुम निसांकाने यंदाच्या आशिया चषकातील पहिलं शतक झळकावलं. निसांकाने ५२ चेंडूत ७ चौकार आणि ६ षटकारांसह १०१ धावा करत शतक झळकावलं आहे. तर कुसल परेराने ३२ चेंडूत ८ चौकार आणि एका षटकारासह ५८ धावांची खेळी केली.

भारताकडून हार्दिक पंड्या, वरूण चक्रवर्ती, कुलदीप यादव व अर्शदीप सिंग यांनी १-१ विकेट्स घेतल्या.श्रीलंकेने नाणेफेक जिंकत भारताला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केलं. भारताने प्रथम फलंदाजी करताना ५ बाद २०२ धावांचा डोंगर उभारला. भारताची ही धावसंख्या आशिया चषक २०२५ मधील सर्वोच्च धावसंख्या ठरली. भारताच्या या मोठ्या धावसंख्येत भारताच्या सर्व फलंदाजांनी योगदान दिलं. अभिषेक शर्माने पुन्हा एकदा अर्धशतकी खेळी करत भारताच्या मोठ्या धावसंख्येचा पाया रचला. अभिषेकने ६१ धावांची उत्कृष्ट खेळी केली.अभिषेकनंतर तिलक वर्मा आणि संजू सॅमसनने अर्धशतकी भागीदारी करत संघाचा डाव पुढे नेला. तिलक वर्मा ४९ धावा करत नाबाद माघारी परतला. अवघ्या एका धावेसह त्याचं अर्धशतक हुकलं. तर संजू सॅमसन ३ षटकारांसह ३९ धावांची उत्कृष्ट खेळी करत बाद झाला. यानंतर अक्षर पटेलने २१ धावांची महत्त्वपूर्ण खेळी करत तिलकसह ४० धावांची भागीदारी रचली आणि संघाला २०० धावांचा आकडा पार करून दिला. श्रीलंकेकडून नुवान तुषारा वगळता सर्व गोलंदाजांनी प्रत्येकी १-१ विकेट्स घेतल्या.

# यजमान भारताचे सर्वोत्तम कामगिरीचे लक्ष्य

## जागतिक पॅरा ॲथलेटिक्स स्पर्धा आजपासून नवी दिल्लीत

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**जगातील सर्वोत्तम अपंग धावपटू आज, शनिवारपासून सुरू होणाऱ्या सर्वांत मोठ्या जागतिक पॅरा-ॲथलेटिक्स स्पर्धेत धैर्य आणि लवचीकता दाखवून सर्वांचे लक्ष वेधून घेण्यासाठी सज्ज आहेत. राजधानी दिल्लीतील प्रतिष्ठेच्या जवाहरलाल नेहरू स्टेडियममध्ये ही स्पर्धा ५ ऑक्टोबरपर्यंत चालणार असून यात यजमान भारताचे आजवरच्या सर्वोत्तम कामगिरीचे लक्ष्य असेल.**




नऊ दिवस चालणाऱ्या या स्पर्धेत १०४ देशांतील २२०० खेळाडू आणि अधिकारी सहभागी होणार आहेत. भारतात होणारी ही जागतिक स्पर्धा इतिहासातील सर्वांत मोठी ठरणार असून, भारताने या १२व्या आवृत्तीसाठी खेळाडूंना सर्वोच्च दर्जाच्या सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. कतार, संयुक्त अरब अमिराती आणि जपाननंतर या प्रतिष्ठित स्पर्धेचे आयोजन करणारा भारत चौथा आशियाई देश ठरला आहे.

या स्पर्धेत सर्वोत्तम पॅरा-खेळाडू १८६ पदकांसाठी आपले कौशल्य पणाला लावतील. गेल्या वर्षी जपानमध्ये झालेल्या स्पर्धेपेक्षा यंदा १५ अधिक पदके दिली जाणार आहेत.

या स्पर्धेत नवे जागतिक विक्रम नोंदवले जातील, नवे विजेते मिळतील असा विश्वास व्यक्त करून जागतिक पॅरा ॲथलेटिक्सचे अध्यक्ष पॉल फिट्झगेराल्ड यांनी स्पर्धेसाठी उपलब्ध करून देण्यात आलेल्या सुविधांबाबत भारताचे कौतुक केले.द्विस्तरीय रबर असलेला आणि एकसमान लवचीकता देणारा मोंडो ट्रॅक या स्पर्धेचे आकर्षण ठरणार आहे. अशा पद्धतीच्या ट्रॅकवर खेळाडू घसरून पडत नाहीत. तसेच सर्वोत्तम दर्जाचे तंदुरुस्ती केंद्रही मैदानात उभारण्यात आले आहे.

## भारतीय मागे राहणार नाहीत

जर्मनीचा ब्लेड जम्पर मार्कस रेहम, स्वित्झर्लंडचा व्हिलचेअर धावपटू कॅथरिन डेबरनर, ब्राझीलचा वेगवान धावपटू पेट्रुसिओ फरेरा, लांब उडीत चार पॅरालिम्पिक आणि सात जागतिक सुवर्णपदके मिळविणारी उडी प्रकारातील खेळाडू रेहम हिच्या कामगिरीकडे लक्ष असेल. अशा या मोठ्या जागतिक स्पर्धेतही आपले कौशल्य दाखविण्यास भारतीय मागे राहणार नाहीत.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

। शनिवार ।

। दि. 27 सप्टेंबर 2025।

## एमबीए व एमसीए विद्यार्थ्यांचा इंडक्शन कार्यक्रम

# ज्ञान कधीही निराश होऊ देत नाही-राज मुच्छाल

### शिक्षण विश्व: प्रतिभा इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंटमध्ये इंडक्शन कार्यक्रमाचे उद्घाटन

। पिंपरी चिंचवड।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**चिंचवड येथील प्रतिभा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटच्या प्रतिभा इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट मधील एमबीए व एमसीए विद्यार्थ्यांच्या इंडक्शन कार्यक्रमाचे उद्घाटन गोपिसन अटायर अँड लाइफस्टाईल कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक राज मुच्छाल यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.**



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक, सचिव डॉ. दीपक शहा होते. यावेळी व्यासपीठावरती संस्थेचा खजिनदार भूपाली शहा, डॉ . तेजल शहा, संचालक डॉ. सचिन बोरगावे विभाग प्रमुख प्रा. गुरुराज डांगरे, प्रा. मनीष पाटणकर उपस्थित होते.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना श्री मुच्छाल पुढे म्हणाले, आयुष्यात नैराश्य तेव्हा येते , जेव्हा आपल्यामध्येच कमतरता असते. यासाठी स्वतःत बदल घडवा. वेळेचे अपव्यय टाळा. ज्ञान आत्मसात करा. ध्येय बोली सकारात्मक ठेवा. संभाषण कौशल्य आत्मसात करा.

भाषेवर प्रभूत्व मिळवा . मदत करा, परंतु त्याचे भांडवल करू नका. आव्हानांना सामोरे जावा. प्रसंगी तज्ज्ञाची मदत घ्या व ध्येय निश्चिती कडे जाण्याच्या प्रामाणिक प्रयत्न करा. असा संदेश त्यांनी यावेळी दिला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थापक सचिव डॉ दीपक शहा म्हणाले, विद्यार्थ्यांनो आभाशी जगात जगू नका. ध्येयपूर्तीचा ध्यास अंगीकारा. इतरांपेक्षा काहीतरी वेगळे आहे ते कृतीरूपी सिद्ध करा. अवांतर वाचन करण्याचे आवाहन केले . पी आय बी एम चे संचालक डॉ. सचिन बोरगावे आपल्या प्रास्ताविकात म्हणाले, नवीन तंत्रज्ञान आत्मसात करा . स्वयंशिस्त अंगीकारा. गुणाच्या मागे न जाता स्पर्धेत स्वतःला सिद्ध करा ,असे आवाहन केले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ . महिमा सिंह यांनी केले तर आभार प्रा जेसीका गोडेटी यांनी मानले .


---

## आयुक्तसाहेब... तर, स्मशानभूमीत वर्ग घ्यावा लागेल!

### महिलांच्या वर्गांसाठी जागेअभावी माजी नगरसेवक तुषार कामठे यांचा प्रशासनाला इशारा!

। पिंपरी- चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका नागरवस्ती विभागामार्फत महिलांसाठी राबविण्यात येणाऱ्या शैक्षणिक व कौशल्यवर्धनाच्या वर्गांसाठी जागेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. वर्गांसाठी योग्य जागा उपलब्ध न झाल्यामुळे महिलांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. यासंदर्भात राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे शहराध्यक्ष व  माजी नगरसेवक तुषार कामठे यांनी थेट आयुक्तांना पत्र देत प्रशासनाला जाब विचारला आहे.**



तुषार गजानन कामठे
नगरसेवक (माजी)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

मनपा : ०२०-६७३३३३३३
मोबाईल : ९९६०९९९९९८
E-mail : ward26b@pcmcindia.gov.in
tushar.kamthe9@gmail.com

कार्यालय : विनायक नगर, पिंपळे निलख, पुणे – ४११ ०२७. दि. १८/०९

प्रति
मा आयुक्त तथा प्रशासन अधिकारी पिंपरी चिंचवड महानगरपालिका
महोदय,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका नागरवस्ती विभागामार्फत महिलांसाठी शैक्षणिक व कौशल्यवर्धनाचे विविध वर्ग राबविले जात आहेत. मात्र या वर्गांसाठी योग्य जागा उपलब्ध होत नसल्याने महिलांना मोठ्या प्रमाणावर अडचणींचा सामना करावा लागत आहे.
उद्यान विभागाने बांधकाम केलेला सुमारे २००० स्क्वेअर फूटचा हॉल या परिसरात असून, सदर हॉलवर काही जेष्ठ नागरिकांनी अतिक्रमण केलेले आहे. यामुळे महिलांच्या वर्गांच्या नियमित आयोजनात अडथळा निर्माण होत आहे.
त्यावर तोडगा म्हणून –
- सदर हॉल महिलांच्या वर्गांसाठी नियमित उपलब्ध करून द्यावा.
- जेष्ठ नागरिकांना आठवड्यातून एक दिवस संपूर्ण दिवस हॉलचा वापर करण्याची परवानगी द्यावी.

यामुळे महिलांचे वर्ग सुरळीतपणे चालतील तसेच जेष्ठ नागरिकांचाही सन्मान राखला जाईल. अन्यथा प्रशासनाने याबाबत तातडीने निर्णय न घेतल्यास महिलांना जागा न मिळाल्यामुळे आंदोलनाचा भाग म्हणून स्मशानभूमीत वर्ग सुरू करावे लागतील, याची नोंद घ्यावी.

आपला नम्र,
तुषार गजानन कामठे
नगरसेवक / शहराध्यक्ष
राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार)
पिंपरी चिंचवड शहर
९९६०९९९९९८ / ९१४६०५५०५५

याबाबत महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांना निवेदन दिले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, उद्यान विभागाने बांधलेला सुमारे २००० स्क्वेअर फूटचा हॉल सद्यस्थितीत काही जेष्ठ नागरिकांच्या ताब्यात असून, त्याठिकाणी महिलांचे वर्ग घेण्यास अडथळा निर्माण होत आहे.



“महिलांच्या शिक्षणासाठी आणि स्वावलंबनासाठी आपण नेहमीच पुढाकार घेतो. मात्र, महानगरपालिकेच्याच हॉलवर अतिक्रमण झाल्यामुळे वर्ग घेणे अशक्य झाले आहे. जर प्रशासनाने तातडीने योग्य निर्णय घेतला नाही, तर महिलांना वर्ग स्मशानभूमीत घ्यावे लागतील – आणि त्याची पूर्ण जबाबदारी प्रशासनाची असेल.”
— **तुषार कामठे,** शहराध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरद पवार)

या पार्श्वभूमीवर कामठे यांनी हॉल महिलांच्या वर्गांसाठी नियमित उपलब्ध करून देण्याची मागणी केली असून, जेष्ठ नागरिकांना आठवड्यातून एक दिवस पूर्णवेळ वापराची मुभा द्यावी, असा तोडगाही सुचवला आहे.

कामठे यांनी प्रशासनाला इशारा दिला आहे की, जर वेळेत निर्णय घेण्यात आला नाही, तर महिलांना वर्ग घेण्यासाठी स्मशानभूमीसारख्या ठिकाणी जावे लागेल आणि याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनावर असेल. ही बाब महिला सक्षमीकरणाच्या दिशेने कार्यरत असलेल्या महापालिकेसाठी अत्यंत गंभीर असून, आता प्रशासन याकडे कसा प्रतिसाद देते, याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.

## भव्य गणित आणि विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन

# विद्यार्थ्यांनी जाणून घेतली गणित आणि विज्ञानाची गंमत!

## शिक्षण विश्व: संत साई स्कूलमध्ये गणित आणि विज्ञान प्रदर्शन उत्साहात संपन्न

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज



**पिंपरी चिंचवड| प्रतिनिधी: भोसरी येथील संत साई इंग्लिश मिडियम हायस्कूल येथे विद्यार्थ्यांमध्ये गणित आणि विज्ञान विषयांची गोडी निर्माण व्हावी तसेच त्यांच्या उपजत कल्पकतेला वाव मिळावा या उद्देशाने दरवर्षीप्रमाणे यंदाही भव्य गणित आणि विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.**

या प्रदर्शनाचे उद्घाटन डीआरडीओचे निवृत्त वरिष्ठ शास्त्रज्ञ अशोक नगरकर यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती वंदना आणि दीपप्रज्वलनाने झाली. यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष शिवलिंग ढवळेश्वर यांचे मार्गदर्शन लाभले.

प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी विविध वैज्ञानिक संकल्पना व गणितीय प्रयोग सादर केले. स्मार्ट छत्री, हैड्रोपोनिक शेती, वायू शुद्धीकरण यंत्र, सोलर ट्रॅकर, सांडपाण्यावर प्रक्रिया करणारी यंत्रणा, गवतापासून तयार केलेले कागद, सैनिकांसाठी स्मार्ट शूज, ऊर्जा व पाण्याचे स्रोत, पवन व सौर ऊर्जा, चुंबकसूची आणि न्यूटनचे नियम या संकल्पनांवर आधारित प्रात्यक्षिकांनी उपस्थितांचे विशेष लक्ष वेधले.

गणित विभागातही विद्यार्थ्यांनी विविध आकृत्या, नियम, भूमितीय संकल्पना आणि कल्पनाशक्तीच्या जोरावर तयार केलेले उपक्रम सादर केले. प्रत्येक विद्यार्थ्याने आपला प्रकल्प समजावून सांगताना आत्मविश्वास व जिज्ञासा याचे दर्शन घडवले.

प्रदर्शनाच्या पार्श्वभूमीवर विविध विषयांचे तज्ज्ञ शिक्षक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत होते. पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेत अप्रतिम सादरीकरण केले. शाळेच्या वतीने उत्कृष्ट प्रकल्प सादर करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर बक्षिसे देण्यात येणार आहेत.

संस्थेचे अध्यक्ष शिवलिंग ढवळेश्वर सर यांनी विद्यार्थ्यांना संशोधन आणि नाविन्यपूर्ण विचाराकडे वळण्याचे आवाहन करत शेतकरी, सामान्य नागरिक यांच्या उपयोगी पडणाऱ्या उपकरणांच्या निर्मितीकडे विद्यार्थ्यांनी वळावे असे सांगितले. त्यांनी सांगितले की देशाच्या प्रगतीसाठी विज्ञान आणि तंत्रज्ञानाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.

या कार्यक्रमासाठी संस्थेच्या संचालिका सुनिता ढवळेश्वर, विश्वस्त पायल ढवळेश्वर, उपमुख्याध्यापिका रुपाली खोल्लम, पूजा पावटेकर,.मंजुषा वाळवेकर, स्वाती मोघे, गौरी शिंदे, मालन लिगाडे, शिवकन्या कांगणे यांच्यासह शिक्षक, पालक प्रतिनिधी आणि पालक वर्ग उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षकवर्ग, संस्था चालक, पालक व विद्यार्थी यांनी परिश्रम घेतले. 'शाश्वत विकासासाठी नाविन्यपूर्ण गणित व विज्ञान उपक्रम' या संकल्पनेवर आधारित हे प्रदर्शन विद्यार्थी, पालक आणि शैक्षणिक क्षेत्रासाठी प्रेरणादायी ठरले.



गायत्री स्कूलमध्ये नवरात्र उत्सव साजरा करण्यात आला.


Pune District Education Association's
Seth Govind Raghunath Sable
College of Pharmacy
Saswad, Pune - 412301
D.Pharm/B.Pharm/M.Pharm/Ph.D.
PDEA
Pharmacy Council of India
SPPU Affiliation
A
NAAC
NAAC Accreditation
Maharashtra State Board of Technical Education
Facilitation & Verification Center for
F. Y. B.Pharm, F.Y.M.Pharm,and
Direct S.Y.B.Pharm Admission 2025–26
Admission Schedule for
F.Y.B.Pharm
Online Registration & Document Upload
07 – 21July 2025 (10:00AM-5:00PM)
Document Verification & Form Confirmation (Physical Scrutiny at FC)
08 – 22 July 2025 (10:00AM-5:00 PM)
Display of Provisional Merit List
25 July 2025
Grievance Submission (Online / at FC)
26– 28 July 2025 (10:00AM-5:00 PM)
Final Merit List
31 July 2025
Your Trusted Facilitation Centre!
FC Code 6372
Important Note:
• Bring all original + Xerox copies of documents
• Late registrations after 14 July are for Non-CAP seats only
"Your First Step Towards a Bright Pharmacy Career!"
Confirm Your Application Now!
Visit Us for Physical Scrutiny
PDEA's Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy, Saswad
Timings: 10:00 AM – 5:00 PM (including Saturday & Sunday)
Contact: Dr. Nilesh Bhosale – 9860503549



भोसरी येथील संत साई स्कूलमध्ये नवरात्र उत्सवानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन केले होते.



मास्टर माईंड ग्लोबल स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज मध्ये शारदीय नवरात्रोत्सवाचा पाचवा दिवस साजरा करण्यात आला.